# भारतीय संघराज्यातील बदलते प्रवाह

**डॉ. एच. एस. कुचेकर** भाई तुकाराम कोलेकर महाविद्यालय, नेसरी. ता.गडहिंग्लज. जि.कोल्हापुर.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर. मोबा. 9922346844

---

**प्रस्तावना** :- भारत हा जगातील एक विशाल आणि खंडप्राय देश आहे. भारताचा विस्तृत भूप्रदेश आणि वाढती लोकसंख्या, भाषिक, प्रादेशिक, सांस्कृतिक विविधता असल्यामुळे, विविध प्रांतातील लोकांना आपल्या भाषिक, सांस्कृतिक, प्रादेशिक अस्मिता जतन करता यावी. त्यासोबतच राष्ट्रीय एकात्मता, अखंडता अबाधित राहावी. या प्रमुख उद्देशाने भारताने संघराज्य शासनप्रणालीचा स्वीकार केला, संघराज्य म्हणजे केंद्र व राज्य अशा दोन स्तरावर स्वायत्त शासन यंत्रणा अस्तित्वात असणे होय. भारतातील संघराज्य शासनप्रणालीचा पाया ब्रिटीश राजवटीमध्ये घातला गेला. राष्ट्रीय सभेच्या 1904 सालच्या अधिवेशनापासूनच भारतीय राष्ट्रवाद्यांनी संघराज्यात्मक पध्दतीचा विचार मांडण्यास सुरुवात केल्याचे दिसते.1919 च्या मॉटेग्यु-चेम्सफर्ड अहवालामध्ये प्रांतिक स्वायत्ततेचा पुरस्कार करण्यात आल्याचे दिसते. परंतू त्यानुसार प्रत्यक्षात प्रांतांना स्वायतता मिळाली नव्हती. 1927 साली सायमन कमिशनने भारतासारख्या देशाला संघराज्य पध्दती योग्य आहे अशी शिफारस केली. पहिल्या गोलमेज परिषदेत राष्ट्रीय सभा, संस्थानिक आणि मुस्लिम प्रतिनिधींनी संघराज्याची मागणी केली. 1935 च्या कायद्यामध्ये पहिल्यांदाच संघराज्य या संकल्पनेचा समावेश केला. या कायद्यात भारताचे संघराज्य असा शब्दप्रयोग केला आहे.[1] भारतीय संविधानाने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर केंद्र व घटक राज्यांमध्ये केलेली अधिकाराची विभागणी, ही याच कायद्यावर आधारित असल्याचे दिसून येते.

1990 नंतरच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय बदलामुळे संघराज्याचे स्वरूप बदलत असल्याचे दिसून येते. प्रस्तुत शोधनिबंधात 'भारतीय संघराज्यातील बदलते प्रवाह यावर काही अंशी प्रकाश टाकला आहे.

**उद्दिष्टे**

1. संघराज्य शासनपद्धती समजून घेणे
2. भारतीय संघराज्याच्या बदलत्या स्वरूपाचा आढावा घेणे

**गृहितक :-**

1. भारतीय संघराज्याची वाटचाल काळानुरुप बदलत गेली आहे.
2. भारतीय संघराज्यात नव्या प्रवाहांचा प्रभाव दिसून येतो.

**संशोधन पद्धती व स्त्रोत:-** प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी द्वितीय साधनसामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यात प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, संशोधन पत्रिका, मासिके, विविध जर्नल्समधील लेख इ. चा आधार घेतला आहे.

**संघराज्य शासन पद्धती :-**

जगभरातील देशांच्या शासनव्यवस्था ह्या सत्तेचे केंद्रीकरण आणि विकेंद्रीकरण या तत्वानुसार "एकात्मिक शासनपद्धती" आणि "संघराज्यात्मक शासनपद्धती" अशा दोन शासन पद्धतीत विभागलेल्या आहेत.

1. एकात्मिक शासनपद्धतीमध्ये सर्व अधिकार हे केंद्र शासनाकडे असतात, हि व्यवस्था इंग्लंड, फ्रान्स, जपान, चीन, इटली बेल्जियम, नॉर्वे, स्वीडन स्पेन इत्यादी देशात अस्तित्वात आहे.

2. संघराज्य शासनपद्धतीमध्ये अधिकाराची विभागणी ही केंद्र आणि राज्य यांच्यात संविधानानुसार झालेली असते. केंद्रस्तरावर केंद्र सरकार आणि घटकराज्य पातळीवर घटकराज्य सरकार असते. साधारणत: संघराज्यव्यवस्था ही भाषा, धर्म, प्रांत अशा विविधता असलेल्या देशात आढळून येते. जगामध्ये सर्वप्रथम संघराज्य शासनपद्धतीचा स्वीकार अमेरिकेने 1789 मध्ये केलेला आहे. त्यानंतर भारतासह, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, स्वित्झर्लंड आणि दक्षिण आफ्रिका अशा विविध देशांनी संघराज्य शासनपद्धतीचा स्वीकार केलेला आहे. तरीही भारताची संघराज्य व्यवस्था ही अमेरिकन मॉडेल वर आधारित नसून कॅनडाच्या मॉडेल वर आधारित आहे.[2]

**संघराज्य शासनपद्धती : अर्थ**

संघराज्य हा एक शासनाचा प्रकार असून आधुनिक घटनात्मक शासनाच्या इतिहासात काही सार्वभौम राष्ट्रांनी समान उद्देशांच्या प्राप्तीसाठी एकत्र येऊन संघराज्य निर्मितीचा प्रयोग केल्याचे दिसून येते.

संघराज्य हा शब्द इंग्रजीमधील Federation या शब्दाचे मराठी भाषांतर आहे. "फेडरेशन" ही संज्ञा "फेड्स" या लॅटिन शब्दापासून बनली आहे. त्याचा अर्थ आहे 'करार' किंवा "सहमती". घटकराज्यातील सहमतीनुसार किंवा करारानुसार संघराज्य हे नवे राज्य (राजकीय प्रणाली) स्थापन होते. संघराज्यातील घटकांना अमेरिकेत स्टेट्स, स्वित्झर्लंडमध्ये कॅन्टन, कॅनडामध्ये प्रॉव्हिन्सेस व रशियामध्ये रिपब्लिक असे संबोधले जाते.[3]

1. संघराज्य शासनपद्धती म्हणजे केंद्र आणि घटकराज्यातील एक प्रकारचा करार असून या कराराद्वारे केंद्र आणि घटकराज्यात शासनविषयक अधिकारांची राज्यघटनेद्वारे लिखित स्वरुपात विभागणी होय.

2. ज्या शासनव्यवस्थेत अधिकाराचे विभाजन हे केंद्र आणि राज्य या दोघांमध्ये लिखित स्वरूपात घटनेच्या माध्यमातून होते. शिवाय दोघातील वाद व संघर्ष सोडवण्यासाठी सर्वोच्च न्यायालय असते. अशा शासनव्यवस्थेला संघराज्यात्मक शासन व्यवस्था असे म्हणतात.[4]

3. प्रा. डायसी यांच्या मते, "संघराज्य शासनपद्धती म्हणजे राष्ट्रीय एकता आणि राष्ट्रीय सत्ता यांचा घटकराज्याच्या हक्कांशी समन्वय साधण्याचा प्रयत्न करणारी शासन पद्धती होय" [5]

**संघराज्याचे प्रकार :-**

संघराज्य शासनपद्धती ही कोणत्या प्रवृत्तीमधून निर्माण झालेली आहे. यावरून त्या संघराज्य शासनपद्धतीचे स्वरूप निश्चित होत असते. प्रवृत्ती आणि स्वरूपावरूनच संघराज्य शासन पद्धतीचे पुढील दोन प्रकार पडतात

**1. केंद्राकर्षी संघराज्य** - यात लष्करीदृष्ट्या दुर्बल किंवा आर्थिकदृष्ट्या मागासलेले अनेक स्वतंत्र देश एकत्र येऊन एक मोठे व मजबूत संघराज्य स्थापन करू शकतात. उदा. अमेरिका. हे जगातले पहिले व सर्वात जुने संघराज्य आहे. संरक्षण आणि विकास यासाठी 13 स्वतंत्र राज्ये एकत्र आली होती. अमेरिकेला संघराज्याचे मॉडेल समजले जाते.

**2. केंद्रोत्सारी संघराज्य** - यात एक अखंड भूप्रदेश विविध कारणामुळे घटक राज्यांची निर्मिती करतो. तेव्हा ते संघराज्यात परिवर्तित होऊ शकते. उदा. भारत. भारतात सध्या 28 घटकराज्ये आहेत**.** भारतीय समाजव्यवस्थेत आढळणारी विविधता, सामाजिक, राजकीय विकासाचे सामाईक उद्दीष्ट, लोकशाही विकेंद्रीकरणाचे तत्व आणि प्रशासकीय सोय इत्यादी[6] कारणांचा विचार करून भारतीय घटनाकारांनी केंद्रोत्सारी संघराज्यव्यवस्था स्विकारली आहे.

**संघराज्याची वैशिष्ट्ये :-**

1. संघराज्यास लिखित राज्यघटना असते.
2. केंद्र व राज्य स्तरावर त्यांची स्वत:ची अशी सरकारे असतात आणि त्यांच्यामध्ये सत्ता विभागणी होते.
3. संविधानात केंद्र आणि राज्ये यांच्यातील सत्ताविभाजन कशा प्रकारचे असेल याची तरतुद करण्यात आलेली असते.
4. संसदेचे वरिष्ठ सभागृह म्हणजे राज्यसभा राज्यांचे प्रतिनिधित्व करते.[7]

**भारतीय संघराज्याचे स्वरूप** :–

भारतीय संविधानात 'संघराज्य' (फेडरेशन) हा शब्द कोठेही वापरलेला नाही. त्याऐवजी भारतीय संविधानाच्या कलम एक मध्ये भारताला "राज्यांचा संघ" (युनियन ऑफ स्टेट) असे म्हटले आहे. (1) अमेरिकेतील संघराज्याप्रमाणे भारतीय संघराज्य हे राज्यातील करारानुसार स्थापन झाले नाही आणि (2) राज्यांना संघराज्यातून बाहेर पडण्याचा अधिकार नाही. या दोन कारणांसाठी संघराज्य म्हणण्याऐवजी "राज्यांचा संघ" असे म्हटले आहे. संघराज्य हा एक संघ आहे. कारण ते अविनाशी आहे. असे डॉ. बी. आर. आंबेडकर यांनी म्हटले आहे.[8]

भारतीय संघराज्याचे स्वरूप निश्चितपणे कोणते आहे हे जाणून घेण्यासाठी काही विचारवंत, अभ्यासकांनी आपली भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

1 मायकेल स्टुअर्ट, हे भारतीय संघराज्याच्या संदर्भात म्हणतात की, "भारतीय संघराज्य हे एकात्मक व संघराज्यात्मक पद्धतीचे मिश्रण आहे."[9]

2. के.सी. व्हियर, यांच्या मते, "भारतीय संघराज्य हे अर्ध संघराज्य आहे". कारण की, केंद्र सरकार घटक राज्यांच्या सीमा बदलू शकते. घटक राज्याचे नाव बदलू शकते, किंवा घटक राज्यांचे विभाजन करत त्यांची दोन राज्ये बनवू शकते, ते घटक राज्याचे परिवर्तन केंद्रशासित प्रदेशात करू शकते. किंवा एखाद्या केंद्रशासित प्रदेशास घटक राज्याचा दर्जा देवू शकते. सर्वसाधारणपणे कोणत्याही संघराज्यात घटक राज्यांचे स्वरुप एवढ्या मोठ्या प्रमाणात बदलता येत नाही. पण भारतीय संघराज्य त्यास अपवाद आहे.

3. पॉल ॲपलबी यांनी "भारतीय व्यवस्था ही सर्वथा संघराज्यीय स्वरुपाची आहे" असे म्हटले. मॉरिस जोन्स यांनी "भारतीय संघराज्य हे वाटाघाटीचे संघराज्य आहे "असा उल्लेख केलेला आहे. आयव्हर जेनिंग्ज यांनी "प्रबळ केंद्रीकरणाची प्रवृती असणारे संघराज्य" असे संबोधले आहे. ग्रॅनव्हिल ऑस्टिन यांनी "सहकारी स्वरुपाचे संघराज्य" असे संबोधले आहे.[10] असे असले तरी भारतीय शासनव्यवस्थेची चौकट ही संघराज्याची आहे आणि आत्मा हा केंद्राकर्षी आहे असेच दिसून येते. केंद्राकर्षी करण्याच्या पाठीमागे काही कारणे होती. त्यामध्ये प्रामुख्याने, स्वातंत्र्यपूर्व भारत हा 565 संस्थाने आणि ब्रिटिश प्रांतात विभागलेला होता. त्यामुळे स्वातंत्र्यानंतर त्यांचे ऐक्य निर्माण करणे व ते टिकवण्यासाठी, तसेच भारतात भाषा, संस्कृती, सामाजिक व सांस्कृतिक विविधता यांचे ऐक्य निर्माण करण्यासाठी संघराज्यात्मक शासन पद्धती स्वीकारण्यात आली.[11]

**भारतीय संघराज्याची वाटचाल :-**

**1. केंद्रीकृत संघराज्य 1950 ते 1967** - भारतीय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सन 1950 ते 1967 या दोन दशका दरम्यानचा विचार करता आपणास असे दिसून येते की, सुरुवातीची बरीच वर्षे एकपक्षीय राजवट अस्तित्वात होती. 1950 ते 1964 पर्यंत भारतीय राजकारणात तत्कालिन पंतप्रधान पं. नेहरू यांचे वर्चस्व होते. या कालखंडाला नेहरू युग असे म्हटले जाते. या कालखंडात पक्षाच्या केंद्रीय सरकारात असलेल्या पक्ष नेतृत्वाचे स्थान हे निश्चितच राज्य पातळीवरील नेत्यापेक्षा श्रेष्ठ होते. त्यामुळे प्रादेशिक पातळीवरील नेते दुय्यम होते. तसेच 1950 ते 1967 च्या दरम्यान राज्य निर्मितीचा मुद्दा सोडला तर केंद्र - राज्य संबंधांमध्ये केंद्राचा वरचष्मा राहूनही केंद्र - राज्य मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित होऊन केंद्र - राज्यात तीव्र असे मतभेद निर्माण झाले नव्हते. त्यामुळे केंद्रीकरणाची प्रवृत्ती निर्माण झाली.

2. **केंद्र- राज्य तणाव पर्व 1967 ते 71: -** सन 1967 मधील चौथ्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर भारतातील सत्तेचे केंद्र घटकराज्याकडे झुकले, काँग्रेस पक्षाची एक हाती सत्ता अनेक घटक राज्यात संपुष्टात येऊन काँग्रेस वर्चस्वाला तडाखा बसला. या काळात पहिल्यांदाच काँग्रेसला आठ राज्यांमध्ये निर्विवाद बहुमतास मुकावे लागले. त्यापैकी सात राज्यांमध्ये वेगवेगळ्या विरोधी पक्षांच्या आघाड्यांची सरकारे निर्माण झाली. त्यांची सरकारे व केंद्रीय काँग्रेस सरकार यांच्यात स्वाभाविकच अनेक कारणावरून तणाव निर्माण झाले. उदा. कधी राज्यपाल पदावरून, तर कधी आर्थिक मदतीवरून, कधी औद्योगिक विकासात राज्याराज्यांत पडत असणा-या तफावतीमुळे व केंद्राकडून होणारा भेदभाव[12] इत्यादीमुळे तणाव निर्माण झाले

**3.1971 नंतरची परिस्थिती** - 1971 साली झालेल्या पाचव्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत पुन्हा इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाला केंद्राची आणि 1972 मधील राज्य विधानसभा निवडणूकीत अनेक राज्यांचीही सत्ता मिळाली. इंदिरा गांधींची कारकिर्द सत्तेच्या अमाप केंद्रीकरणाची ठरली. राज्याचे मुख्यमंत्री केंद्रसरकारने निवडणे, त्यातही सामान्यत: राज्याच्या राजकारणात ज्याला सशक्त आधार नसेल अशीच माणसे मुख्यमंत्रीपदावर बसवणे, त्यांना आपल्या मनाप्रमाणे बदलणे हे श्रीमती गांधींच्या राजकीय शैलीचे वैशिष्ट्य होते.[13] या काळात सत्तेचे केंद्र केंद्रसरकारकडे झुकले. कॉग्रेस पक्षच भारतात स्थिर शासन देऊ शकतो, भारतीय जनतेचे नेतृत्व करू शकतो अशी धारणा झाली. पंतप्रधान इंदिरा गांधीं यांनी देशांतर्गत असंतोषाच्या कारणाखाली 25 जुन 1975 ते मार्च 1977 या काळात राष्ट्रीय आणीबाणी लागू करुन भारताला एकात्म संघराज्याचे स्वरुप दिले होते.

पुढे 1977 च्या निवडणूकीत आणीबाणीला विरोध करून सत्तेवर आलेला जनता पक्षही देशातील केंद्र - राज्य संबंधात मौलिक फेरबदल घडवून आणू शकला नाही. जनता पक्षाच्या हाती एकवटलेली सत्ता पक्षपातीपणे वापरून काही राज्यात जी काँग्रेसची सरकारे होती. ती बरखास्त करून तिथे राष्ट्रपती राजवट जनता पक्षाने लागू केली. मात्र जनता पक्षाचे सरकार अल्पायुषी ठरले आणि 1980 साली श्रीमती इंदिरा गांधींचा काँग्रेस पक्ष पुन्हा केंद्रात सत्तेवर आला. या पुनरागमनानंतर तर केंद्रीकरणाची प्रवृत्ती अगदी शिगेला पोचली. 1984 नंतरही केंद्रीकरण प्रवृत्तीचा वारसा राजीव गांधींनी पुढे चालू ठेवला. यातून केंद्र - राज्य संबंधाबाबत एक नवा आयाम चर्चेत आला. तो आयाम म्हणजे एका बाजूला विकेंद्रीकरणाचा उदो उदो करायचा आणि दुस-या बाजूला राज्यसरकारांना मात्र सडकून काढायचे असे राजीव गांधींचे धोरण होते.

**4. 1989 नंतर आघाडीचे राजकारण**: - भारतीय राजकारणात बदल होवुन आघाडी राजकारणाला सुरुवात झाली. सन 1989 ते 2009 च्या दरम्यान झालेल्या लोकसभा निवडणुकांमधून हे स्पष्ट झाले की, श्री. व्हि. पी. सिंग (1989), चंद्रशेखर (1990), पी व्ही नरसिंहराव (1991), एच.डी. देवेगौडा (1996), इंद्रकुमार गुजराल (1997), अटल बिहारी वाजपेयी (1998) आणि (1999 ) तसेच डॉ. मनमोहन सिंग (2004) आणि (2009) यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारे ही आघाडी राजकारणाची असल्यामुळे त्यांना सत्ता टिकवण्यासाठी प्रादेशिक पक्षांचा आधार घ्यावा लागला होता. संघराज्याच्या दृष्टीने एक गोष्ट दिसते ती अशी की, प्रादेशिक पक्षांची प्रतिष्ठा वाढल्यामुळे आणि केंद्रात सत्तारूढ असलेल्या आघाडी सरकारच्या सत्तेत त्या पक्षांना वाटेकरी होता आल्यामुळे केंद्र व घटकराज्ये यांच्यातील तणाव ओसरण्यास बराच हातभार लागला. आणि दुसरे असे की स्थानिक व प्रादेशिक प्रश्नांना देशपातळीवरील स्पर्धात्मक राजकारणात आपोआपच महत्वाचे स्थान प्राप्त झाले.

मात्र सन 2014 ची सोळाव्या आणि 2019 ची सतराव्या लोकसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला नरेंद्र मोदींच्या वलयांकित नेतृत्वामुळे स्पष्ट बहुमत (303 जागा ) मिळाल्यामुळे, विविध घटक राज्यातील प्रादेशिक पक्षांच्या सरकारकडून होणाऱ्या वाटाघाटीच्या राजकारणाला काही प्रमाणात आळा बसल्याचे दिसून येते. मात्र 2024 च्या निवडणूकीत भारतीय जनता पक्षाला 240 जागा मिळाल्या त्यामुळे परत विविध घटक राज्यातील प्रादेशिक पक्षांच्या सरकारकडून होणाऱ्या वाटाघाटीच्या राजकारणाला काही प्रमाणात महत्व आल्याचे दिसून येते. अशा प्रकारे भारतीय संघराज्याची वाटचाल झालेली दिसून येते.

**भारतीय संघराज्यातील बदलते प्रवाह :-**

1990 नंतरच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय बदलामुळे संघराज्याचे स्वरूप बदलत असल्याचे दिसते. भारतीय संघराज्याचे मुळ स्वरुप संघराज्याचेच असून आणीबाणीसारख्या अपवादात्मक काळापुरता संघराज्याचा लोप होतो. पण अगदी 1975 च्या आणीबाणीतही सर्व राज्यांची सरकारे बरखास्त करून एकात्म राज्यव्यवस्था स्थापन केलेली नव्हती हे लक्षात घ्यायला हवे.[14] 1990 नंतर भारतीय राजकारणात संघराज्याच्या संदर्भात वेगवेगळे नवे प्रवाह निर्माण झालेले आपणास दिसतात. हे प्रवाह खालीलप्रमाणे:-

1.**राज्य निर्मितीसाठी भाषिक आधाराऐवजी सांस्कृतिक आणि आर्थिक आधार जास्त महत्त्वाचा ठरत आहे: -**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय संघराज्याच्या रचनेचा व फेररचनेचा आधार भाषा हा होता. भारतात 1956 साली भाषेच्या आधारावर भाषावार प्रांत रचना करण्यात आली. भाषा घटकावर विविध 15 घटक राज्ये अस्तित्वात आली. त्यामुळे प्रत्येक भारतीय भाषेच्या विकासास वाव मिळाला. परंतू 1990 नंतरच्या काळात भाषिक आधाराऐवजी सांस्कृतिक विकास व आर्थिक आधार राज्यरचना फेररचनेसाठी जास्त महत्त्वाचा ठरत आहे.उदा.

**अ**. 15 नोव्हेंबर 2000 मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने झारखंड व छत्तीसगड ही दोन स्वतंत्र घटक राज्ये आदिवासींच्या सांस्कृतिक व वांशिक अलगतेच्या आधारावर निर्माण केली.

**ब**. उत्तरांचल - सांस्कृतिक अस्मितेबरोबरच प्रादेशिक अस्मितेचा पर्वतीय भागातील जनतेच्या आशा - आकांक्षांचा पुरस्कार करणारे घटकराज्य निर्माण केले गेले.[15]

**क**. 2 जून 2014 रोजी आंध्रप्रदेश या तेलगू भाषिक राज्याची फेररचना करून अस्तित्वात आलेले तेलंगणा हे घटकराज्य भाषिक आधाराऐवजी विकास व आर्थिक आधारावर अस्तित्वात आल्याचे स्पष्ट होते.

**2. राष्ट्रीय राजकीय पक्षांचा प्रभाव कमी आणि केंद्र सरकारचे सहमतीचे राजकारण:-** भारतीय राजकारणात 1989 पासून ते 2014 पर्यंत राष्ट्रीय पातळीवरील राष्ट्रीय दर्जाच्या राजकीय पक्षांचा प्रभाव कमी होत असल्यामुळे व प्रादेशिक पक्षांचा राजकीय प्रभाव वाढत असल्यामुळे काँग्रेस आणि भारतीय जनता पक्ष या राष्ट्रीय पक्षांना केंद्रात सरकार स्थापन करण्यासाठी, प्रादेशिक पक्षांच्या व इतर लहान पक्षांच्या पाठिंब्यावर अवलंबून राहावे लागले. त्यामुळे केंद्रातील राष्ट्रीय पातळीवरील सत्ताधारी राजकीय पक्षांच्या आघाडी सरकारला सहमतीच्या आधारावर राज्यकारभार करणे हे अपरिहार्य झालेले दिसते. उदा. वाजपेयी मंत्रिमंडळात 24, डॉ. मनमोहन सिंगाच्या मंत्रिमंडळात 14 पक्ष आणि 2019 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या मंत्रिमंडळात 11 मित्र पक्ष समाविष्ट होते. या सर्वांचे सहकार्य घेवून लोकशाही आघाडीची सरकारे स्थापन झालेली दिसतात.

**3. केंद्राला मनमानी पध्दतीने राज्यात कलम 356 अन्वये आणीबाणी लादणे अशक्य**:- एकपक्षीय वर्चस्वाच्या कालखंडात कलम 356 चा अनेकदा गैरवापर झाल्याची उदाहरणे आहेत. या कलमाद्वारे राज्यातील विरोधी पक्षांची सरकारे बरखास्त करण्यात आलेली होती. त्यातून केंद्र-राज्य संबंध ताणलेले होते. परंतु 1994 साली सर्वोच्च न्यायालयाने या कलमाच्या गैरवापरावर काही निर्बंध घातले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने 1994 साली एस. आर. बोम्मई खटल्यात राज्यघटनेतील 356 व्या कलमाच्या वापरावर पुढील बंधने घातली. (1) कलम 356 चा वापर केल्यास न्यायालय त्याचे पुनर्विलोकन करू शकते. (2) राज्य सरकार अल्पमतात आले आहे हे विधानसभेच्या सभागृहात सिद्ध झाल्याशिवाय राज्यपालांनी सरकार बरखास्तीचा निर्णय घेऊ नये. (3) संसदेच्या दोन्ही सभागृहांची मान्यता मिळाल्याशिवाय राज्यपालांना विधानसभा बरखास्त करता येत नाही. (4) न्यायालयांच्या आज्ञेनुसार विधानसभा पुनरुज्जीवित करता येते. या बंधनांमुळे केंद्राला आपल्या इच्छेप्रमाणे घटक राज्यांमध्ये राष्ट्रपती शासन लादणे अवघड झाले आहे. बोम्मई खटल्यामुळे 1994 नंतर 356 व्या कलमाचा गैरवापर झाल्याची उदाहरणे खूपच अत्यल्प सापडतात.[16]

4. **केंद्र सरकारला राज्यांचे अधिकार मर्यादित करणे अशक्य-** भारतातील राष्ट्रीय पक्षांचा प्रभाव कमी होत चालल्यामुळे आणि प्रादेशिक राजकीय पक्षांचा प्रभाव वाढत असल्यामुळे केंद्रात आघाडी सरकारे अपरिहार्य ठरली आहेत. परिणामी केंद्राला पूर्वीप्रमाणे आपल्या अधिकारांचा गैरवापर करणे. अथवा राज्यांच्या अधिकारांना मर्यादित करणे शक्य होत नाही. त्यामुळे घटक राज्यांना सामावून घेतच, केंद्र सरकारला शासनकारभार करावा लागत आहे.

**5. विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांतील बदल :-** आधुनिक राजकारणाचा केंद्रबिंदु प्रादेशिक वा भाषिक अस्मितांचा पुरस्कार करणे हा नसून विकासाच्या अनुशेषाचा आहे.1990 नंतर विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रांमध्ये संपूर्ण जगाबरोबरच भारतानेही मोठी प्रगती केली आहे. या क्षेत्रातील प्रगतीमुळे पर्यावरण - नियंत्रण, अवकाश-भ्रमण, दूरध्वनी- मोबाइल आणि त्यासाठीचे स्पेक्ट्रम्स, संगणक इत्यादी क्षेत्रांमध्ये प्रगती झाली. पण ही सर्व नवी क्षेत्रे केंद्राच्या नियंत्रणाखाली आली. या सर्व क्षेत्रांमध्ये राज्य शासनांपेक्षा केंद्र शासन अधिक सक्रिय दिसते. ह्या वैज्ञानिक प्रगतीची तितकीशी कल्पना घटना निर्मात्यांनाही नसल्याने ही सर्व क्षेत्रे केंद्रशासनाच्या नियंत्रणासाठी उपलब्ध झालेली दिसतात. या तांत्रिक संसाधनासंदर्भात राज्य सरकारे आणि केंद्र सरकार हे खाजगी कंपन्यांवर अवलंबून असल्याचे दिसते. संघराज्य व्यवस्थेमध्ये माहिती तंत्रज्ञान हे केंद्रीकरणाचे माध्यम ठरले आहे. त्यामुळे केंद्र शासनाला प्रचार, प्रसिद्धी, प्रसार माध्यमे या सर्वांच्या माध्यमातून लोकांवर प्रभाव टाकणे शक्य होते. त्यातून अधिकारांची आणि कार्याची अनेक नवी दालने केंद्राला उपलब्ध झाली आहेत.

प्रसार माध्यमांतील या क्रांतिकारी बदलांचा एक परिणाम म्हणून प्रादेशिक अस्मितांचा प्रभाव कमी होऊ लागला. संचार माध्यमांबरोबरच प्रसार माध्यमांच्या विस्तारामुळे प्रादेशिक सीमापार होणारा व्यापार, देवाणघेवाण तसेच कामगार व उद्योगपती यांच्या स्थलांतराचे वाढते प्रमाण इ. गोष्टी विचारात घेतल्यास आता राज्यांच्या सीमा मर्यादित झालेल्या आहेत. प्रांतवाद कमी होऊन राष्ट्रहित, आंतरराष्ट्रीय क्षेत्रात देशाने बजावयाची भूमिका या सर्व

बाबतीत लोक आता केंद्र शासनाकडून योग्य धोरणांची आणि कार्यवाहीची अपेक्षा करताना दिसतात. या घटना केंद्र शासनास प्रबळ करणाऱ्या ठरताना दिसत आहेत.[17]

**निष्कर्ष:-** भारताने संघराज्य शासनपध्दतीचा स्विकार केला असून संविधानात संघराज्य या शब्दाचा उल्लेख नसून भारत हा राज्यांचा संघ असल्याचे म्हटले आहे. भारतीय संविधानात संघराज्य या शब्दाचा उल्लेख नसला तरी वास्तवात भारत एक संघराज्य आहे हे स्पष्ट होते. केंद्र व राज्यसरकारच्या दोन घटनात्मक पातळ्यांची तरतूद, केंद्र व घटकराज्य शासनामध्ये अधिकार वाटप, लिखित राज्यघटना, दोन सभागृहाचे कायदेमंडळ ही संघराज्याची वैशिष्ट्ये आढळतात. केंद्र- राज्य संबंध अभ्यासले असता केंद्र सरकार प्रबळ बनलेले आहे. तसेच स्वातंत्र्य प्राप्तीपासून आजपर्यंतच्या काळात भारतीय संघराज्याची वाटचल विविध टप्प्यात झाल्याचे स्पष्ट होते.

सन 1990 नंतरच्या काळात भारतीय संघराज्याच्या स्वरूपात सामाजिक, आर्थिक, राजकीय बदलामुळे काही बदल झाल्याचे स्पष्ट दिसते. राज्य निर्मितीसाठी भाषिक आधाराऐवजी सांस्कृतिक आणि आर्थिक आधाराला जास्त महत्त्व, राष्ट्रीय स्तरावरील राजकीय पक्षांचा प्रभाव कमी होवून प्रादेशिक पक्षांचा राजकीय प्रभाव वाढला, त्यामुळे केंद्रात आघाडी सरकारचे पर्व सुरू झाले आणि केंद्र सरकारचे घटकराज्य सरकारसोबत सहमतीच्या आधारावर राज्यकारभार करणे हे अपरिहार्य झाल्याचे दिसते. केंद्राला आपल्या मनमानी पध्दतीने राज्यात कलम 356 अन्वये आणीबाणी लादणे अशक्य होणे, विज्ञान आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांतील बदल इ. घटकामुळे भारतीय संघराज्याला नवे स्वरूप प्राप्त होत असल्याचे दिसून येते.

**संदर्भग्रंथ :-**

1. डॉ. विवेक घोटाळे (2024) भारतीय राज्यघटना, द युनिक फौऊंडेशन पूणे, पृ. क्र. 106-07
2. श्री. रंजन कोळंबे, (2016) भारतीय राज्यघटना आणि प्रशासन, भगीरथ प्रकाशन, पूणे पृ. क्र. 59
3. एम.लक्ष्मीकांत,(अनु.श्रीकांत गोखले)(2017), इंडियन पॉलिटी, के' सागर पब्लिकेशन्स, पुणे. पृ. क्र.171
4. डॉ. ह. नि. सोनकांबळे व दिलीप जऊळकर (2020), भारतीय संविधान शासन, प्रशासन व राजकारण, पार्थ पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. क्र. 88
5. डॉ.बाबासाहेब त्रिंबक मोताळे,(2022) भारतीय संविधानाची ओळख, अर्थव पब्लिकेशन्स, पृ. क्र. 38
6. तुकाराम जाधव, महेश शिरपूरकर, (2011), भारतीय राजकीय व्यवस्थेचा आकृतिबंध खंड 1 भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रक्रिया, द युनिक ॲकॅडमि, पुणे. पृ. क्र. 98
7. योजना मासिक, एप्रिल 2020, पृ. क्र. 46
8. एम. लक्ष्मीकांत, (अनु.श्रीकांत गोखले), इंडियन पॉलिटी, पूर्वोक्त. पृ. क्र. 171
9. डॉ.बाबासाहेब त्रिंबक मोताळे, पूर्वोक्त. पृ. क्र. 39
10. तुकाराम जाधव, महेश शिरपूरकर, पूर्वोक्त. पृ. क्र. 101
11. डॉ. ह. नि. सोनकांबळे व दिलीप जऊळकर, पूर्वोक्त. पृ. क्र. 88
12. डॉ. भास्कर लक्ष्मण भोळे, ( 2003) भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर पृ. क्र. 135
13. तैत्रव, पृ. क्र. 138
14. तुकाराम जाधव, महेश शिरपूरकर, पूर्वोक्त. पृ. क्र. 114-15
15. तैत्रव, पृ. क्र. 115
16. डॉ. विवेक घोटाळे, पूर्वोक्त. पृ. क्र. 126
17. तैत्रव, पृ. क्र. 126-27